सा. बां. वि. अहमदनगर

सन २०२०-२१ या आर्थिक वर्षासाठी मा. लोक प्रतिनिधींनी सुचविलेल्या ग्रामीण भागातील गावांतर्गत मुलभूत सुविधा पुरविणे या योजनेंतर्गत विकासकामांना मंजूरी देणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**ग्रामविकास व पंचायत राज विभाग**
**शासन निर्णय क्र. विकास-२०२१/प्र.क्र.१२२/योजना-६**
बांधकाम भवन, २५ मर्झबान रोड, फोर्ट, मुंबई-४०० ००१.
**दिनांक : ३० मार्च, २०२१.**

संदर्भ: १) शासन निर्णय, ग्रा.वि.व.ज.सं.वि.क्र. झेडपीए-२०१५/प्र.क्र-१०/वित्त-९, दि. २५/०३/२०१५
२) शासन निर्णय, ग्रा.वि.व.ज.सं.वि.क्र.विकास- २०१५/प्र.क्र.५२/यो-६,दि.२७/०३/२०१५.
३) शासन निर्णय, ग्रा.वि.व.ज.सं.वि.क्र.विकास- २०१५/प्र.क्र.२७४/यो-६,दि.१६/१२/२०१५
४) ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्र.विकास-२०१८/प्र.क्र.२२५/योजना-६, दि.२२/१०/२०१८.
५) ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्र. विकास-२०१८/प्र.क्र.२२५/योजना-६, दि.०१/०२/२०१९.
६) ग्रामविकास विभाग, शासन शुद्धीपत्रक क्र. विकास-२०१८/प्र.क्र.२२५/योजना-६,दि.०८/०३/२०१९.
७) ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्र.विकास-२०१९/प्र.क्र.४४/योजना-६, दि.२५/०७/२०१९.
८) ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक: विकास-२०२०/प्र.क्र.२२५/योजना-६,दि.१७/०२/२०२०.

**शासन निर्णय :-**

राज्यातील गावांतर्गत मुलभूत सुविधांच्या कामांसाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत अनेक लोकप्रतिनिधींकडून प्रस्ताव शासनाकडे प्राप्त होत असतात. त्या अनुषंगाने लोकप्रतिनिधींनी सुचविलेल्या ग्रामीण भागातील गावांतर्गत मुलभूत सुविधांच्या कामांसंदर्भात संदर्भाधिन क्र. २ ते ८ येथील शासन निर्णय निर्गमित करण्यात आले आहेत.

२. सबब, सदर शासन निर्णयान्वये सन २०२०-२१ या आर्थिक वर्षात सोबत जोडलेल्या अनुसूचीप्रमाणे अहमदनगर जिल्हयातील विकासकामांसाठी सोबत जोडलेल्या अनुसुचीप्रमाणे **एकूण रु.२४५०.०० लक्ष (अक्षरी दोन हजार चारशे पन्नास लक्ष फक्त)** इतक्या रकमेच्या कामांस प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

३. या शासन निर्णयान्वये मंजूर केलेल्या कामांसाठी प्रचलित कार्यपध्दतीनुसार तांत्रिक मंजूरी, निविदा काढणे/स्वीकरणे व कार्यारंभ आदेश देणे इत्यादी बाबतची कार्यवाही सक्षम प्राधिकाऱ्याकडून करुन घेण्याची जबाबदारी अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, अहमदनगर यांची राहील. तसेच सदरील काम मंजूर अनुदानाच्या मर्यादेतच पूर्ण होतील याची दक्षता घेण्यात यावी. मंजूर अनुदानापेक्षा जास्त खर्चाच्या कामांना मान्यता दिल्यास, त्यासाठी कुठल्याही स्वरुपात अतिरीक्त अनुदान उपलब्ध करुन दिले जाणार नाही.

४. सदरील कामे हाती घेण्यापूर्वी संबंधित क्षेत्रात जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्रामपंचायतीच्या सार्वत्रिक निवडणूका/पोट निवडणूकांसाठी आचारसंहिता अंमलात नाही याबाबत अधिक्षक अभियंता,सार्वजनिक बांधकाम मंडळ, अहमदनगर यांनी खात्री करावी.

५. सर्व कामांच्या पूर्णत्वाचे दाखले व उपयोगिता प्रमाणपत्र अधिक्षक अभियंता,सार्वजनिक बांधकाम मंडळ, अहमदनगर यांनी महालेखापाल, संबंधित विभागीय आयुक्त व शासनास पाठवावेत. तसेच कामे

Scanned with CamScanner

दर्जेदार व चांगल्या प्रतीचे असल्याबाबत विहित समिती/ संबंधितांकडून खात्री करून घेण्यात यावी. कोणत्याही प्रकारची अनियमितता होणार नाही, याची सर्व संबंधितांनी दक्षता घ्यावी. याबाबत संबंधित अधीक्षक अभियंता, सा.बां.मंडळ यांनी विशेष दक्षता घ्यावी, अन्यथा कसूरदारांवर शासनस्तरावरून कारवाई करण्यात येईल.

६. तसेच ज्या कामासाठी अनुदान मंजुर झाले आहे त्याच कामावर खर्च करणे बंधनकारक राहील. **सदर मंजूर कामांच्या यादीमधून संदर्भाधीन शासन निर्णय क्र. २ ते ८ अन्वये विहीत केलेल्या कामांनाच मंजूरी देण्यात यावी.** तसेच,योजनाबाह्य कामे व जी कामे जागेचा अभाव किंवा इतर योजनेंतर्गत या आधी मंजूर असतील किंवा इतर काही कारणांमुळे सुरु करणे शक्य नसतील अशा कामांची शहानिशा करुन त्या कामांची यादी एक महिन्याच्या आत शासनास सादर करावी. तसेच मंजूर कामांना कार्यारंभ आदेश हा शासन निर्णयाच्या मुदतीच्या कालमर्यादेतच द्यावा. या कालावधीनंतर कार्यारंभ आदेश दिल्याचे निदर्शनास आल्यास संबंधितांवर शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल, याचीही नोंद घ्यावी.

७. वरील बाबींवर होणारा खर्च मागणी क्र. एल-३ मुख्य लेखाशिर्ष-२५१५-इतर ग्राम विकास कार्यक्रम-८००-इतर खर्च (०१) (०८) ग्रामीण भागातील विकास कामासाठी जिल्हा परिषदांना सहायक अनुदान (योजनांतर्गत ) दत्तमत (२५१५-१२३८), २७ लहान बांधकामे (वेतनेतर) या लेखाशिर्षाखाली सन २०२०-२१ या चालू वित्तीय वर्षातील तरतूदीतून भागविण्यात यावा व त्याच लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा.

८. सदर निधी वितरीत करतांना वित्त विभागाचे परिपत्रक क्र. क्र.अर्थसं-२०२०/प्र.क्र.६४/अर्थसंकल्प-३, दिनांक १६ एप्रिल २०२० मधील अटी व शर्तींचे पालन करण्यात आले आहे.

९. सदर शासन निर्णय नियोजन विभाग अनौपचारिक संदर्भ क्र.३५७/का.१४४४, दि.१२/०१/२०२१ व वित्त विभाग अनौपचारिक संदर्भ क्र.१५५/२१/व्यय-१५, दि.२५/०३/२०२१ अन्वये दिलेल्या मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,**

(स्वाक्षरी) ३०/०३/२०२१

**(अभिजीत तेलवेकर)**
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१) मा.मुख्यमंत्री,महाराष्ट्र राज्य, मंत्रालय,मुंबई.
२) मा. उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय,मुंबई.
२) मा.मंत्री, ग्रा.वि.यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
३) मा.राज्यमंत्री, ग्रा.वि.यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
४) महालेखापाल, लेखा व अनुज्ञेयता,१/२ , महाराष्ट्र, मुंबई.
५) महालेखापाल, लेखा व परिक्षा, १/२, महाराष्ट्र, मुंबई.
६) अधिक्षक अभियंता,सार्वजनिक बांधकाम मंडळ, अहमदनगर.
७) कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग ,जि. अहमदनगर.
८) स्वीय सहायक, अप्पर मुख्य सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
९) स्वीय सहायक, अप्पर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
१०) स्वीय सहायक, अतिरिक्त मुख्य सचिव, ग्रामविकास विभाग, बांधकाम भवन, मुंबई-०१.
११) निवडनस्ती, कार्यासन योजना-६.

Scanned with CamScanner

ग्रामविकास विभाग,शासन निर्णय क्र.विकास-२०२१/प्र.क्र.१२२/यो-६,दि.३० मार्च,२०२१ च्या आदेशासोबतची अनुसूची-२५१५ अंतर्गत अहमदनगर जिल्हयातील (सा.बां.वि.) विकास कामांची यादी

| अ.क्र. | कामाचे नाव | रक्कम (रू.लक्ष) |
|---|---|---|
| १ | माहू ते केकताई , बा.नांदुर ता राहुरी रस्ता मजबुतीकरण व डांबरीकरण करणे | ५०.०० |
| २ | कात्रड, वांबोरी, शिवरस्ता, गाव कात्रड ता राहूरी माहू ते केकताई , बा.नांदुर ता राहुरी रस्ता मजबुतीकरण व डांबरीकरण करणे | ३५.०० |
| ३ | सोनगाव अंतर्गत सात्रळ चौक ते धानोरी घाट ता राहूरी रस्ता मजबुतीकरण व डांबरीकरण करणे | २०.०० |
| ४ | तांदुळवाडी अंतर्गत ता राहूरी तांदुळवाडी गावठाण आयटीआय कॉलेज ते जूना राहूरी (शेळके वस्ती ) रस्ता मजबुतीकरण व डांबरीकरण करणे | ३५.०० |
| ५ | वडारवाडी ता राहूरी अंतर्गत वैद्य कॉलनी रस्ता कॉक्रीटीकरण करणे | २०.०० |
| ६ | तांभेरे अंतर्गत ता राहूरी तांभेरे मराठी शाळा ते चिंचोली फाटा रस्ता मजबुतीकरण व डांबरीकरण करणे | २५.०० |
| ७ | कोढवड ता राहूरी अंतर्गत कोंढवड ते जुना पिंप्री अवघड रस्ता खडीकरण करणे | १५.०० |
| ८ | बा नांदूर ता राहूरी अंतर्गत राहूरी बा नांदूर रोड ते राहूर मल्हारवाडी रोड मधील राहूरी बा नांदूर शिव रस्ता खडीकरण करणे | ३५.०० |
| ९ | बा नांदूर ता राहूरी अंतर्गत राहूरी बा नांदूर जांभळी डिग्रस नर्सरी येथील नदीतील रस्ता कॉक्रीटीकरण व सी डी वर्क करणे | २५.०० |
| १० | बा नांदूर ता राहूरी अंतर्गत बोरटेक ते बन रस्ता मजबूतीकरण व डांबरीकरण करणे | ३०.०० |
| ११ | बा नांदूर ता राहूरी अंतर्गत गावठाण हनुमान मंदीर पेव्हिंग ब्लॉक बसवणे | ५.०० |
| १२ | कणगर ता राहूरी अंतर्गत दिवे वस्ती येथे समाज मंदीर बांधणे | २५.०० |
| १३ | डिग्रस ता राहूरी अंतर्गत नगर मनमाड रोड ते ज्ञानगंगा हायस्कूल रस्ता खडीकरण करणे | १०.०० |
| १४ | देसवंडी ता राहूरी अंतर्गत पवार वस्ती ते थिटे वस्ती रस्ता मजबुतीकरण व डांबरीकरण करणे | २५.०० |
| १५ | शिलेगाव ता राहूरी अंतर्गत शिलेगाव गावठाण ते करपरावाडी रस्ता मजबुतीकरण व डांबरीकरण कर णे | ४०.०० |
| १६ | म्हैसगाव ता राहूरी अंतर्गत केदारेश्वर केटीवेअर वर रस्ता करणे | ३.०० |
| १७ | शिराळ ता पाथर्डी अंतर्गत मुळे वस्ती ते कडगांव रस्ता मजबुतीकरण व डांबरीकरण करणे | २५.०० |
| १८ | शिराळ ता पाथर्डी अतर्गत तुपे वस्ती रस्ता खडीकरण करणे | १०.०० |
| १९ | कणगर ता राहूरी अंतर्गत जुना कणगर र स्ता ते वडाचे लवण रस्ता मजबुतीकरण व डांबरीकरण करणे | २५.०० |
| २० | वावरथ ता राहूरी अतर्गत वावरथ खिलारवाडी सभा मंडप बांधणे | १२.०० |
| २१ | कणगर ता राहूरी अंतर्गत वावरथ कळवतनिची वाडी ते पुनोबाची वाडी रस्ता मजबुतीकरण व डांबरीकरण करणे | २५.०० |

Scanned with CamScanner

| | | |
|---|---|---|
| ९५ | प्रजिमा २१ पासून ते गागरे जोशी वस्तीकडे जाणारा रस्ता मजबुतीकरण व डांबरीकरण करणे, ता. श्रीरामपूर | ६०.०० |
| ९६ | खंडाळा येथे अण्णाभाऊ साठे नगर वस्तीअंर्गत स्मशानभुमी रोड व पेव्हींग ब्लॉक बसविणे, ता. श्रीरामपूर | १५.०० |
| ९७ | प्रजिमा २१ ते भैरवनाथ मंदिर रस्ता (कि.मी. १.५००) मजबुतीकरण डांबरीकरण करणे, ता. श्रीरामपूर | ५०.०० |
| ९८ | लाख येथील दशक्रिया विधीसाठी घाट बांधणे व व सुशोभीकरण करणे, ता.राहुरी | ४५.०० |
| ९९ | मौजे पाबळ,ता.पारनेर तळेवाडी ते पांढरकर वस्ती रस्ता करणे. | १५.०० |
| १०० | मौजे जवळा,ता.पारनेर जवळा ते गाडीलगाव रस्ता करणे. | २५.०० |
| १०१ | मौजे पळसपुर ता.पारनेर स्मशानभूमी परिसर सुशोभिकरण करणे. | २५.०० |
| १०२ | मौजे शिरापूर ता.पारनेर उचाळेवस्ती पूर्व ते शिरापूर रस्ता करणे. | २५.०० |
| १०३ | मौजे हंगा ता.पारनेर सामाजिक सभागृह बांधणे. | ५०.०० |
| १०४ | मौजे भोयरे गांगर्डा ता.पारनेर गजाबाई /मुक्ताबाई मंदिर पेव्हर ब्लॉक बसविणे. | २५.०० |
| १०५ | मौजे कारेगाव ता.पारनेर चारंगेश्वर मंदिर सभामंडप बांधणे. | १५.०० |
| १०६ | मौजे कारेगाव ता.पारनेर गजाबाई /मुक्ताबाई मंदिर पेव्हर ब्लॉक बसविणे. | १०.०० |
| १०७ | मौजे पिंपरी पठार ता.पारनेर भैरवनाथ मंदिर सभामंडप बांधणे. | २५.०० |
| १०८ | मौजे वेसदरे ता.पारनेर सांस्कृतिक भवन बांधणे. | १५.०० |
| १०९ | मौजे वेसदरे ता.पारनेर सांस्कृतिक भवन बांधणे. | १०.०० |
| ११० | मौजे जाधववाडी ता.पारनेर स्मशानभुमी सुशोभीकरण करणे. | १०.०० |
| १११ | मौजे जाधववाडी ता.पारनेर जाधववाडी ते जाधववाडी मुख्य प्रवेशव्दार रस्ता करणे. | १५.०० |
| ११२ | मौजे रांधे ता.पारनेर रांधुबाई मंदिर सभामंडप बांधणे. | १५.०० |
| ११३ | मौजे रांधे ता.पारनेर मुस्लिम मज्जीत परिसर सुशोभिकरण करणे. | १०.०० |
| ११४ | मौजे देसवडे ता.पारनेर टेकडवाडी ते काळेवाडी घाट रस्ता करणे. | २५.०० |
| ११५ | मौजे राळेगण थेरपाळ ता.पारनेर डोमे वस्ती ते खंडोबा मंदिर रस्ता करणे. | १५.०० |
| ११६ | मौजे कडूस ता.पारनेर वाघजाई मंदिरासमोर सभामंडप बांधणे. | ५.०० |
| ११७ | मौजे नांदूर पठार ता.पारनेर श्रीकृष्ण मंदिर परिसर सुशोभीकरण करणे. | ५.०० |
| ११८ | मौजे बाबुर्डी बेंद ता.नगर गावठाण ते सारोळा शिवरस्ता करणे. | २५.०० |
| ११९ | मौजे पिंपरी घुमट,ता.नगर पिंपरी घुमट ते हांडे वस्ती रस्ता नळकांडी पुलासह रस्ता करणे. | २०.०० |
| १२० | मौजे अकोळनेर ता.नगर गावांतर्गत रस्ता कॉक्रीटीकरण करणे. | १०.०० |
| १२१ | मौजे देऊळगाव सिध्दी ता.नगर येथे सास्कृतिक सभागृह बाधणे. | ५०.०० |
| १२२ | मौजे बाबुर्डी घुमट ता.नगर येथील रस्ता करणे. | २०.०० |
| १२३ | मौजे नांदगाव ता.नगर होलट वस्ती ते कोलबेट वस्ती तयार करणे. | १०.०० |
| १२४ | मौजे हिंगणगाव ता.नगर कुरणमळा येथील रस्ता करणे. | २५.०० |
| | एकूण रक्कम | २४५०.०० |

Scanned with CamScanner